RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(६)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ४९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XXXVII OF 2025**

A BILL

TO AMEND THE HINDU MARRIAGE ACT, 1955, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७.**

**हिंदू विवाह अधिनियम, १९५५ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, हिंदू विवाह अधिनियम, १९५५ हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :– सन १९५५ चा अधिनियम क्रमांक २५.

**१.** (१) या अधिनियमास, हिंदू विवाह (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**२.** हिंदू विवाह अधिनियम, १९५५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनिय" असा करण्यात आला आहे) हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्याच्या कलम ५ मधील खंड (दोन) मध्ये–

(१) उप खंड (ग) मधील " वा अपस्माराचे झटके येत नसावेत" या मजकुरानंतर " किंवा" हा शब्द दाखल करण्यात येईल.

(२) उप खंड (ग) नंतर, पुढील उप खंड समाविष्ट करण्यात येईल :–

"(घ) एड्स या दुर्धर रोगाने ग्रस्त अथवा एच. आय. व्ही. बाधित नसावा."

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम २५ ची सुधारणा

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २५ मध्ये –

(अ) पोट-कलम (१) मधील "उत्तरवादीचे जर काही", या मजकुराने प्रारंभ होणारा आणि "न्यायालयास न्याय वाटेल" या मजकुराने समाप्त होणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :-

"उत्तरवादीचे स्वतःचे उत्पन्न आणि अन्य संपत्ती यांच्या पंचवीस टक्के दरमहा रुपये २००० पैकी जी रक्कम अधिक असेल त्या रकमेपेक्षा कमी असणार नाही":

(ब) पोट-कलम (१) नंतर, पुढील नवीन पोट-कलम समाविष्ट करण्यात येईलः-

" (१क) पोट-कलम (१) अन्वये न्यायालयाकडून मंजूर करण्यात आलेली रक्कम अर्जदाराला देण्याकरिता, उत्तरवादीकडून न्यायालयात जमा केली जाईल".

सन १९५५ चा अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम २५ नंतर नवीन कलम २५-क समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २५ नंतर, पुढील नवीन कलम समाविष्ट करण्यात येईल :–

"अर्ज केल्यापासून सहा महिन्यांच्या आत न्यायालयाने आदेश काढावा.

"२५-क. कलम २५ अन्वये केलेल्या अर्जाच्या संबंधात असा अर्ज केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत, न्यायालयाकडून निर्णय देण्यात येईल आणि अंतिम आदेश काढण्यात येईल."

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

हिंदूधर्मीयांच्या चालीरितीप्रमाणे अलिकडे बहुतांश विवाह हे वधुवरांची पत्रिका एकमेकांशी जुळत असेल तरच केले जातात. विवाहामुळे स्त्री-पुरुषांचा एकमेकांशी शारीरिक संबंध येतो त्यामुळे दोहोंपैकी एखादी व्यक्ती एड्सग्रस्त अथवा एचआयव्ही बाधित असल्यास त्याची लागण दुसऱ्या व्यक्तीस होण्याची शक्यता जास्त असते. परंतु, ही बाब एखादी व्यक्ती समोरच्या व्यक्तीपासून लपवून ठेवते व लग्नानंतर अशा गोष्टी उघडकीस आल्या तरी फसवणूक झालेली दुसरी व्यक्ती समाजास घाबरून अथवा समाजातील आपली प्रतिष्ठा मलीन होईल या भीतीने सर्व काही सहन करीत असते. सबब, याबाबतीत परस्परांचे रक्तगट तपासणे सध्या गरजेचे झाले आहे.

मागील शतकाच्या उत्तरार्धाच्या शेवटच्या दोन दशकांत एड्स या रोगांचा प्रादूर्भाव इतका वाढला आहे की, कोणती व्यक्ती या रोगाने ग्रस्त आहे हे ओळखणे कठीण झाले आहे. याबाबीचे गांभीर्य लक्षात घेऊन या गोष्टीस कोठेतरी आळा बसणे आवश्यक झाले आहे.

हिंदू विवाह अधिनियम, १९५५ च्या कलम ५ मध्ये हिंदू विवाहाच्या शर्तीची तरतूद असून त्या शर्तीची पूर्तता न झाल्यास विवाह कायदेशीररित्या झाल्याचे मानण्यात येत नाही. याकरिता एड्सग्रस्त असल्याचे वा एच.आय.व्ही. बाधित असल्याचे लपवून ठेवून एखाद्या व्यक्तीने विवाह केला तर तो मुळातच परिणामहीन ठरण्यासाठी सदरहू कलमात सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे, तसेच, गेल्या दोन दशकामध्ये घटस्फोटित महिलांच्या समस्यांमध्ये खूपच वाढ झालेली आहे. अशा महिलांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी हिंदू विवाह अधिनियम, फौजदारी प्रक्रिया संहिता इत्यादीसारखे अधिनियम करण्यात आले. परंतु, असे आढळून येते की, सध्याच्या तरतुदीमुळे अशा घटस्फोटित्त महिलांना पुरेशा प्रमाणात व सत्वर सहाय्य मिळू शकत नाही.

हिंदू विवाह अधिनियमाच्या कलम २५ मध्ये घटस्फोटित महिलांना पोटगी देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि, असे लक्षात आले आहे की, न्यायालयाकडून पोटगीसाठी मंजूर करण्यात आलेली रक्कम ही अशा महिलांच्या किमान गरजाही भागविण्यास पुरेशी नसते, शिवाय मंजूर केलेली रक्कमसुद्धा अर्जदाराला तत्परतेने आणि नियमितपणे दिली जात नाही. न्यायालयाकडून प्रकरणे निकालात काढण्यास आणि अंतिम आदेश काढण्यास अमर्याद उशीर होत असतो. म्हणून या संबंधातील गोष्टीचे विनियमन करण्यासाठी या अधिनियमातच विनिर्दिष्ट तरतुदी करणे इष्ट वाटते.

वरील उद्दिष्टे साध्य करणे हा विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २६ मे, २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.